# महाराष्ट्र शासन
## शासकीय होमिओपॅथी रुग्णालय , जळगांव.
श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगाव-४२५००२

जा.क्र.शाहोरुज/आस्था/कंत्राटी पदे जाहिरात/ 864 /२०२४ दिनांक - 28/09/2024

**शासकीय होमिओपॅथी रुग्णालय जळगांव येथील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत**

संदर्भ :- १) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस, दिनांक ११ मे २०१७ व दिनांक ०९ मे २०२२, ७ सप्टेंबर, २०२२

२) संचालनालयाचे परिपत्रक क्र.आसंमुं/राज/कंत्राटी/२०२४/आयु-३/१०४०९ दि.१०.०९.२०२४

उपरोक्त संदर्भित दि. ०९.०५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय होमिओपॅथी रुग्णालय, जळगांव येथील पदे मंजुर केलेली असुन, संदर्भित संचालनालयाचे परिपत्रक दि.१०.०९.२०२४ अन्वये सदर पदास नियमानुसार ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

सध्या शासकीय होमिओपॅथी रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीकरिता भरण्यात आलेले आहे. सदर पदावर नियुक्त वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचा ११ महिने नियुक्तीचा कालावधी माहे ३० नोव्हेंबर २०२४ मध्ये संपणार आहे.

सदर रिक्त होणा-या पदांवर ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी विहित अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत.

तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी | ०१ |
| | | ०१ |

| | |
|---|---|
| **प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ -** | **शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव<br>श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगाव-४२५००२** |
| **प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक-** | **दि. 10.10.2024<br>सकाळी 10.00 वा.** |

| | | |
|---|---|---|
| **Post** | | **वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (Senior Medical Officer)** |
| **Age** | | Maximum age limit 65 years |
| **Essential Educational Qualification** | | A recognized degree qualification in Homeopathy. |
| **Desirable** | | Having one year experience as House Physician in a recognized Homoeopathic hospital after obtaining regular registration from a State Board of Homoeopathy. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| मानधन | | प्रतिमाह रु.६०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

इतर अटी

| | | |
|---|---|---|
| | १. | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन नियमित नियुक्तीने किंवा आस्थापना मंडळाकडुन पदोन्नतीने अथवा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा ११ महिने कालावधी किंवा वयाची ६५ वर्षे या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनः कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. तथापी सदर उमेदवाराने त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण केल्यानंतर अशा उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुनर्नियुक्त्या देण्यात येणार नाहीत. |
| | २. | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | ३. | उमेदवारास सार्वजनिक सुटटी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ०८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | ४. | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल. |
| | ५. | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील. |
| | ६. | कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारांस रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना रुग्णालयातील कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. |
| | ७. | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या रुग्णालयीन कर्तव्ये व जबाबदा-यावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | ८. | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा |

| | | |
|---|---|---|
| | | करता येणार नाही. तसेच कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही. |
| | ९. | नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | १०. | कार्यालयीन/रुग्णालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| | ११. | शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील. |
| | १२. | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| | १३. | उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी सादर करणे तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |
| | १४. | सदर पदाचे कंत्राटी मानधन "१०- कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | १५. | CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल. |
| | १६. | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. |
| | १७ | उमेदवारानी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, सध्या इतर संस्थेत कार्यरत असल्यास सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहील. |
| | १८ | उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र तात्काळ सादर करणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक सत्र सुरु असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित/रुग्णहित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही. |
| | १९ | रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचे नियंत्रणाखाली व निर्देशानुसार सदर पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. |

| | | |
|---|---|---|
| | २० | बिगर सेवानिवृत्त गटातून कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. |
| | २१ | उमेदवारास शासन निर्णय वै.शि.व औ.द्र.विभाग क्र.आयुसे-1120/प्र.क्र.89/आयु-1, दि.07.09.2022 अन्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू असुन, त्याचे पालन करणे बंधनकारक राहतील. |

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahaayush.gov.in तसेच www.ghmcjalgaon.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रे व त्यांच्या १ स्वसाक्षांकीत प्रतीसह **शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगाव ४२५००२ येथे स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीकरिता दि.१०.१०.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थिती रहावे.**

(वैद्य अभिजित अहिरे)
प्रभारी अधिष्ठाता,
शासकीय होमीओपॅथी महाविद्यालय, जळगांव

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी.

अर्जाचा नमुना
महाराष्ट्र शासन
शासकीय होमिओपॅथी रुग्णालय, जळगाव

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथी रुग्णालय,
जळगाव

विषय :- शासकीय होमिओपॅथी रुग्णालय, जळगांव येथील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिण्याच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत

संदर्भ:- आपली जाहिरात दिनांक...............

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिण्याच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपुर्ण नांव | : | आडनाव | स्वतं:चे नांव | वडीलांचे/ पतीचे नांव |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | | | |
| ३) | भ्रमणध्वनी क्रमांक : | : | | | |
| ४) | ई-मेल : | : | | | |
| ५) | जन्म दिनांक | : | | | |
| ६) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय | : | वर्ष | महीने | दिवस |
| ७) | राष्ट्रीयत्व | : | | | |

८) **शैक्षणिक अर्हता : बीएचएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या सांक्षाकीत गुणपत्रीका जोडाव्यात :**

| अ.क्रं. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २ | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

| १०) | अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
| | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ११) | सध्या उमेदवार इतर संस्थेमध्ये कार्यरत आहे काय? | होय / नाही |
| १२) | असल्यास संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय? | होय / नाही |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल)

| अ.क्रं. | संस्थेचे नांव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |
| ११. | |
| १२. | |
| १३. | |
| १४. | |
| १५. | |

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपुर्ण नांवासहीत)

## अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी

| Sr.No. | Document Name |
|---|---|
| 01 | SSC Passing Certificate (For D.O.B.)/T.C. (any one) |
| 02 | Nationality/Domicile |
| 03 | BHMS 1st Year to Final Year Marksheet |
| 04 | BHMS passing Certificate |
| 05 | Internship Completion Certificate |
| 06 | BHMS Degree Certificate |
| 07 | PG Degree Certificate/Passing Certificate (if applicable) |
| 08 | Registration Certificate of State Council |
| 09 | MS-CIT or Equivalent Qualification |
| 10 | Experience Certificate |
| 11 | No Objection Certificate from current institute |
| 12 | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) |
| 13 | Research Paper publication in National or International Peer reviewed index journal |
| 14 | Proof of Text Book / Ref. Book/chapter written in any other book approved by university |
| 15 | Participation in National/International CME / Conference / Seminar etc. |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ........................................................................ प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते कि, वर नमुद केलेली माहीती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहीरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीचा उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

(सध्या कार्यरत अध्यापकांनी मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक)

-ना हरकत प्रमाणपत्र -

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य / वैद्या ............................................या महाविद्यालयात दिनांक पासुन या पदावर कार्यरत आहेत. वैद्य / वैद्या ............................................यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या मुलाखतीस महाविद्यालय व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | अधिष्ठात/ प्राचार्य |
|---|---|
| .............................. | .............................. |
| .............................. | .............................. |
| .............................. | .............................. |

(रुजू होताना खालील प्रमाणपत्र सादर करावे)

प्रतिज्ञापत्र (विवाहीत उमेदवारांसाठी)

महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार

नियम अ

मी श्री/ श्रीमती ............................................... श्री. .......................
यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, वर्षे................ राहणार याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी ........................................... या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ............... (संख्या) इतकी हयात मुले आहेत.
त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेली मुलांची संख्या ...........आहे.
(असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तदनंतर जन्माला असलेल्या अपत्यामुळे या पदासाठी अनर्ह/ अपात्र ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक -

उमेदवाराचे नाव व सही.

..............................................................................................